








द्वारा
डॉ.राजेंद्र रामदास अहिरे, प्राचार्य
विद्या विकास मंडळाचे-
सी.गो.पाटील कला,विज्ञान व
वाणिज्य महाविद्यालय,साक्री

# विद्या विकास मंडळाचे
# सी.गो.पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,साक्री ता.साक्री जि.धुळे



## माहिती पत्रक



## PROSPECTUS 2018-2019

### Mission

To seek the ideals and dreams would not be attained without hard work in association with the hand, heart & head. We aim to achieve the above goals through our qualitative and quantitative efforts for the

Ph.02568-242323
Fax 02568-242323
Email : vidyavikas2006@rediffmail.com
Website : www.sgpcsakri.com

# दृष्टीक्षेप

V.V.M.S.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College
SAKRI, Dist.Dhule

- महाविद्यालय स्थापना : १५ जून १९७१
- महाविद्यालय मान्यता :शासन/जा.क्र./नवीन/७१-७२/६३१/२०.३.१९७२
- कॉलेज कोड नं. : २१००२६ कॉलेज सेंटर नंबर २१०५
- यु.जी.सी.१२ (बी) : युजीसी १९५६, ३१-३-२००४
- विद्याशाखा : कला,विज्ञान,वाणिज्य पदवी पर्यंतचे अभ्यासक्रम
- एम.ए.समाजशास्त्र
- पदव्युत्तर संशोधन केंद्र : प्राणिशास्त्र,भौतिकशास्त्र,वनस्पती शास्त्र,मानसशास्त्र
- एकूण विभाग १८
- तज्ञ अनुभवी शिक्षक २५, पी.एच.डी.११, एम.फील.७, नेट सेट ५,
- शिक्षकेतर कर्मचारी ३०
- जिमखाना विभाग : सर्व देशी-विदेशी खेळांची सुविधा
- ग्रथांलय : ग्रंथ संख्या ४२५८६, किंमत रुपये ३६३९८९०/-
- गरीब विद्यार्थ्यांसाठी पुस्तक पेढी योजना, वाचन कक्ष
- राष्ट्रीय सेवा योजना : २५० विद्यार्थी
- राष्ट्रीय छात्र सेना : ५४ विद्यार्थी
- चाणक्य स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र.
- विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी वसतीगृह
- इंग्रजी रेमेडीयल क्लास व नापास विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन
- विद्यार्थी सुरक्षा विमा योजना, कमवा व शिका योजना
- युवती सभा
- विविध मंडळाद्वारे विद्यार्थी व्यक्तिमत्व विकासासाठी प्रयत्न
- पर्यावरण शिक्षण केंद्र
- विद्यार्थी संसद

V.V.M.S.'s S. G. Patil Arts, Sci. & Com. College
SAKRI, Dist.Dhule

# सी.गो.पाटील महाविद्यालय,साक्री

## माहिती पत्रक

उच्च शिक्षणाची वाढती गरज लक्षात घेऊन मा.कै.दादासाहेब रामराव पाटील यांच्या कुशल नेतृत्वाखाली दिनांक २०-५-७० रोजी विद्या विकास मंडळ या शिक्षण संस्थेची मुहुर्तमेढ रोवण्यात आली. या संस्थेच्या विद्यमाने दिनांक १५ जून १९७१ पासून सी.गो.पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,साक्री येथे सुरु करण्यात आले.

आमचे महाविद्यालय उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांवशी संलग्न असून सर्व वर्गाचे अभ्यासक्रम, परीक्षा पध्दती, प्रमोशन पध्दती, प्रवेश, पात्रता व आकारावयाचे शुल्क इत्यादी बाबत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांवच्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येते.

**।। उद्यमेनहिं सिध्यंति ।।**

विद्यार्थ्यांची विविध विषयातील शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, वेगवेगळ्या योजना आणि उपक्रमाद्वारे त्यांच्या व्यक्तीमत्वाची सर्वांगीण जडण-घडण करणे. लोकशाही व्यवस्थेसाठी आवश्यक असलेला आदर्श नागरिक घडविणे, विविध क्षेत्रातील ज्ञानासोबत बदलणाऱ्या परिस्थितीची त्याला ओळख करुन देणे. लोकशाही हा जीवनमार्ग मानून तिची मूल्ये तरुण मनात रुजविण्याचा प्रयत्न करणे. त्याची विज्ञाननिष्ठा वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहणे. त्याचबरोबर विज्ञान आणि भावना यांची जोड देवून सुशिक्षीत आणि सुसंस्कृत माणूस घडविणे. जेणे करुन २१ व्या शतकातील परिवर्तनाशी सामोरे जाण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल. विज्ञाननिष्ठ लोकशाही मूल्य जपणारा, सत्यशोधक, सुशिक्षीत, सुसंस्कृत आणि परिवर्तनशील युवक घडविणे हेच महाविद्यालयाचे ध्येय आहे.

**महाविद्यालयाचा परिसर :**

साक्री गांवाला लागूनच नागपूर - सुरत राष्ट्रीय महामार्गावर महाविद्यालयाच्या वास्तूची उभारणी करण्यात आलेली आहे. या इमारतीत व्यायामशाळा, प्रशासनविभाग, महिला दालन, प्रयोगशाळा, कार्यालय, शिक्षक दालन, ग्रंथालय, वाचनकक्ष, अतिथीगृह, संगणक कक्ष, वसतिगृह, वर्गखोल्या, इ. सर्व सोयी पूर्ण झालेल्या आहेत.

**ग्रंथालय :**

सुसज्ज व समृध्द ग्रंथालय प्रत्येक महाविद्यालयाचा प्राण असतो. आमचे ग्रंथालय संदर्भ ग्रंथ, क्रमिक पुस्तके, मासिके,यांनी समृध्द आहे. महाविद्यालयाने पुस्तक पेढी योजना सुरु केली असून त्यात गरीब विद्यार्थ्यांसाठी क्रमिक पुस्तके मिळू शकतील अशी सोय केलेली आहे. ग्रंथालयाची सुसज्ज इमारत असून स्वतंत्र वाचन कक्ष व रात्रीच्या अभ्यासिके ची व्यवस्था आहे. स्पर्धा परिक्षा तयारीसाठी चाणक्य मंडळाच्या स्वतंत्र वाचन कक्षासह पुस्तकांची व्यवस्था केली आहे.

**ग्रंथालय नियम :**

१) ग्रंथालयात एका वेळेस एकच ग्रंथ मिळेल. परंतु मागणी पत्रिकेत तीन ग्रंथाची नावे द्यावीत.
२) ग्रंथालयातील ग्रंथ ७ दिवसात जमा करावेत, अन्यथा दंड आकारला जाईल.
३) ग्रंथालयातील ग्रंथ काळजीपूर्वक वापरावेत. जर ग्रंथांची पाने फाडली व ग्रंथ गहाळ केले तर ग्रंथाची किंमत वसुल केली जाईल. किंवा तत्सम ग्रंथ आणून द्यावा लागेल.
४) ग्रंथालय अनामत महाविद्यालय सोडल्यानंतर परत केली जाईल.



Scanned with CamScanner

उच्च शिक्षणाची वाढती गरज लक्षात घेऊन मा.कै.दादासाहेब रामराव पाटील यांच्या कुशल नेतृत्वाखाल दिनांक २०-५-७० रोजी विद्या विकास मंडळ या शिक्षण संस्थेची मुहुर्तमेढ रोवण्यात आली. या संस्थेच्या विद्यमा दिनांक १५ जून १९७१ पासून सी.गो.पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,साक्री येथे सुरु करण्यात आले.

आमचे महाविद्यालय उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांवशी संलग्न असून सर्व वर्गाचे अभ्यासक्रम, परीक्ष पध्दती, प्रमोशन पध्दती, प्रवेश, पात्रता व आकारावयाचे शुल्क इत्यादी बाबत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांवच्य नियमानुसार कार्यवाही करण्यात येते.

**।। उद्यमेनहिं सिध्यंति ।।**

विद्यार्थ्यांची विविध विषयातील शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, वेगवेगळ्या योजना आणि उपक्रमाद्वारे त्यांच्य व्यक्तीमत्वाची सर्वांगीण जडण-घडण करणे. लोकशाही व्यवस्थेसाठी आवश्यक असलेला आदर्श नागरिक घडविणे विविध क्षेत्रातील ज्ञानासोबत बदलणाऱ्या परिस्थितीची त्याला ओळख करुन देणे. लोकशाही हा जीवनमार्ग मानून तिच मूल्ये तरुण मनात रुजविण्याचा प्रयत्न करणे. त्याची विज्ञाननिष्ठा वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहणे. त्याचबरोबर विज्ञान आणि भावना यांची जोड देवून सुशिक्षीत आणि सुसंस्कृत माणूस घडविणे. जेणे करुन २१ व्या शतकातील परिवर्तनाश सामोरे जाण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल. विज्ञाननिष्ठ लोकशाही मूल्य जपणारा, सत्यशोधक, सुशिक्षीत, सुसंस्कृत आणि परिवर्तनशील युवक घडविणे हेच महाविद्यालयाचे ध्येय आहे.

**महाविद्यालयाचा परिसर :**

साक्री गांवाला लागूनच नागपूर - सुरत राष्ट्रीय महामार्गावर महाविद्यालयाच्या वास्तूची उभारणी करण्यात आलेली आहे. या इमारतीत व्यायामशाळा, प्रशासनविभाग, महिला दालन, प्रयोगशाळा, कार्यालय, शिक्षक दालन, ग्रंथालय, वाचनकक्ष, अतिथीगृह, संगणक कक्ष, वसतिगृह, वर्गखोल्या, इ. सर्व सोयी पूर्ण झालेल्या आहेत.

**ग्रंथालय :**

सुसज्ज व समृध्द ग्रंथालय प्रत्येक महाविद्यालयाचा प्राण असतो. आमचे ग्रंथालय संदर्भ ग्रंथ, क्रमिक पुस्तके, मासिके,यांनी समृध्द आहे. महाविद्यालयाने पुस्तक पेढी योजना सुरु केली असून त्यात गरीब विद्यार्थ्यांसाठी क्रमिक पुस्तके मिळू शकतील अशी सोय केलेली आहे. ग्रंथालयाची सुसज्ज इमारत असून स्वतंत्र वाचन कक्ष व रात्रीच्या अभ्यासिकेची व्यवस्था आहे. स्पर्धा परिक्षा तयारीसाठी चाणक्य मंडळाच्या स्वतंत्र वाचन कक्षासह पुस्तकांची व्यवस्था केली आहे.

**ग्रंथालय नियम :**

१) ग्रंथालयात एका वेळेस एकच ग्रंथ मिळेल. परंतु मागणी पत्रिकेत तीन ग्रंथाची नावे द्यावीत.

२) ग्रंथालयातील ग्रंथ ७ दिवसात जमा करावेत, अन्यथा दंड आकारला जाईल.

३) ग्रंथालयातील ग्रंथ काळजीपूर्वक वापरावेत. जर ग्रंथांची पाने फाडली व ग्रंथ गहाळ केले तर ग्रंथाची किंमत वसुल केली जाईल. किंवा तत्सम ग्रंथ आणून द्यावा लागेल.

४) ग्रंथालय अनामत महाविद्यालय सोडल्यानंतर परत केली जाईल.

**मुलांचे वसतिगृह :**

साक्रीपासून लांब गावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांना दररोज एस. टी. ने येणे शक्य होत नाही, त्यातल्या त्यात पिंपळनेर,





हिवेल व छडवेल कोर्डेपलीकडे असणाऱ्या आदिवासी गावातील विद्यार्थ्यांना साक्रीत राहण्याची सोय होवू शकत ाही.अशा विद्यार्थ्यांना आमच्या वसतीगृहात मुख्यत्वाने प्रवेश दिला जातो.

**ुलींचे वसतिगृह :**

ाहाविद्यालयाच्या परिसरात २५ विद्यार्थीनींसाठी सुसज्ज व सर्व सोयीयुक्त वसतिगृहाची सुविधा उपलब्ध आहे. या ्यतिरीक्त विद्यार्थीनींसाठी साक्री शहरात शासकीय वसतीगृहाची सोय उपलब्ध आहे.

**वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी नियम :**

१. वसतिगृहात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडे स्वतःची मच्छरदाणी असणे आवश्यक आहे.
२. विद्यार्थ्यांच्या वर्तनासंबंधी महाविद्यालयाने घालून दिलेल्या सर्व नियमांचे वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी काटेकोर पालन केले पाहिजे.
३. रात्री ९-३० ते सकाळी ६ चे दरम्यान प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या खोलीत हजर असले पाहिजे.
४. विद्यार्थ्यांच्या पालकास किंवा पाहुण्यांना कोणत्याही कारणास्तव वसतिगृहात मुळीच राहता येणार नाही.
५. विद्यार्थ्यांने मोठी रक्कम अगर मौल्यवान वस्तू खोलीत ठेऊ नयेत.
६. बाहेरगांवी जातांना विद्यार्थ्यांने वसतीगृह प्रमुखाची परवानगी घेणे आवश्यक आहे.
७ महा.विद्या.बाहेरील कोणत्याही संस्थेचे किंवा संघटनेचे कार्य वसतिगृहाच्या परिसरात चालू दिले जाणार नाही.
८. महाविद्यालयात किंवा वसतिगृहात कोणतेही शिस्तबाह्य वर्तन किंवा महाविद्यालयाला कमीपणा येईल असे वर्तन आढळल्यास संबंधीत विद्यार्थ्यांस वसतिगृहातून कमी करण्यात येईल.
९. वरील कोणत्याही नियमाचे किंवा वसतिगृह प्रमुखाने वेळोवेळी घालुन दिलेल्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विद्यार्थ्यांस योग्य ते शासन केले जाईल.

**शारीरिक शिक्षण व खेळ :**

बौद्धिक शिक्षणाला शारीरिक शिक्षण व खेळ यांची जोड असल्याखेरीज व्यक्तिमत्वाचा समतोल विकास होवू शकत नाही, या दृष्टीने जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना खेळात सामावून घेतले जाते. त्यासाठी तज्ञ शिक्षकांची नेमणूक करण्यात आलेली असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध देशी व विदेशी खेळ शिकविण्याची सोय करण्यात आली आहे. आंतर विभागीय सामन्यात आमच्या संघांनी आपली चमक वेळोवेळी दाखविली आहे.

**राष्ट्रीय सेवा योजना :**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकासाचे उद्दिष्ट समोर ठेवून आमच्या महाविद्यालयात १९७८ पासून राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक कार्यरत आहे. श्रमप्रतिष्ठा, सहजीवन, सेवाभाव, साहचर्य, व्यक्तीमत्व व नेतृत्व विकास, सामाजिक बांधिलकी इत्यादी गुण विद्यार्थ्यात विकसित व्हावेत म्हणून एकक प्रयत्न करते. उत्तर महाराष्ट्र विद्यापिठाने सन २००१-२००२ साली आमच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककाचा उत्कृष्ट कार्यगौरव पुरस्कार देऊन सन्मान केला आहे. आमच्या एककात नियमित कार्यक्रमासाठी २५० तर विशेष शिबिरासाठी १२५ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

**राष्ट्रीय छात्र सेना :**

विद्यार्थ्यात सैनिकी जीवनाची व शिस्तीची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने आमच्या महाविद्यालयात सन



Scanned with CamScanner

१९७८ पासून राष्ट्रीय छात्र सेनेचे पथक कार्यरत आहे. 'बी' व 'सी' प्रमाणपत्र परिक्षेला बसण्याची सुविधा उपलब्ध आहे. छात्र सेनेत ५४ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो.

**चाणक्य स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र :**

आजचं युग हे स्पर्धेचं युग आहे, स्पर्धा परिक्षांना समर्थपणे सामोरं जाण्याची क्षमता ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांमध्ये यावी म्हणून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २००७-२००८ पासून आमच्या महाविद्यालयाला चाणक्य स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्रास मान्यता दिलेली आहे. केंद्रासाठी स्वतंत्र ग्रंथालय व अनुभवी प्राध्यापक वर्ग आहे.

**प्राध्यापक वर्ग :**

महाविद्यालयासाठी आपल्या विषयात तज्ञ, अनुभवी, कार्यक्षम व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांबद्दल सहानभूती असणाऱ्या प्राध्यापकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी आमचा प्राध्यापक वर्ग सदैव प्रयत्नशिल असतो. आमच्या प्राध्यापकांनी एम. फील., पी.एच. डी.सारख्या शिक्षण क्षेत्रातील उच्च पदव्या संपादन केलेल्या आहेत. यु.जी.सी. ने मंजूर केलेले अनेक संशोधन प्रकल्प प्राध्यापकांनी पूर्ण केले आहेत.

**सांस्कृतिक व मूल्यशिक्षण :**

अभ्यासक्रमाव्यतिरीक्त विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा विकास व्हावा व त्यांच्या व्यक्तिमत्वाची सर्वांगीण वाढ व्हावी या उद्देशाने सांस्कृतिक कार्यक्रम आखले जातात. वादविवाद मंडळ, कलामंडळ, वाङ्मय मंडळ, शैक्षणिक सहली इ. कार्यक्रम योजिले जातात. एकलव्य प्रशिक्षण केंद्रामार्फत आदिवासी विद्यार्थी विकास योजना राबविल्या जातात व त्याद्वारे मूल्यशिक्षण दिले जाते.

**बक्षिसे, शिष्यवृत्त्या व आर्थिक सवलती :**

परीक्षेत चांगले यश मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्याच्या हेतूने महाविद्यालयाकडून बक्षिसे व शिष्यवृत्त्या देण्यात येतात.

१. १२ वी च्या आणि विद्यापीठ परिक्षेत शेकडा ६०% पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांमधून गुणवत्तेच्या क्रमानुसार शिष्यवृत्या दिल्या जातात.
२. वार्षिक परिक्षेत पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे दिली जातात.
३. मागास वर्गातील विद्यार्थी ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १,००,०००/- पेक्षा कमी आहे व सैनिकांच्या मुलांमुलींची फी सरकारकडून मिळत असते.
४. गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना विद्यार्थी निधीतून योग्य ती मदत दिली जाते. कमवा शिका योजने अंतर्गत श्रमाच्या मोबदल्यात योग्य ते आर्थिक सहाय्य देण्यात येते.
५. महाराष्ट्र शासन व केंद्र सरकारने वेळोवेळी जाहीर केलेल्या सवलती व शिष्यवृत्या या संबधीची माहिती विद्यार्थ्यांना दिली जाते व त्यासाठी छापील नमुन्यात अर्ज मागविले जातात.
६. आदिवासी विद्यार्थ्यांकडून एकलव्य विद्याधन योजनेसाठी अर्ज मागविले जातात.

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ : महाविद्यालय प्रवेश घेण्यासंबंधी माहिती :-**

महाविद्यालयात प्रवेश घेण्यापूर्वी प्रत्येक विद्यार्थ्याने माहितीपत्रक विकत घेवून संबंधीत वर्गाचा प्रवेश अर्ज





करावा. प्रत्येक विषयासाठी चाचणी परीक्षा प्रत्येक सत्रात घेतली जाईल. तसेच ८० टक्के हजेरी सक्तिची राहील. याबाबत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांच्याकडून जे जे बदल करण्यात येतील त्यांची लगेच अंमलबजावणी करण्यात येईल. वरिष्ठ महाविद्यालयातील प्रत्येक वर्गासाठी अगर कोर्ससाठी प्रवेश देतांना तुकड्या व संख्या यांचे बंधन आहे. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अध्यादेशानूसार सर्व विद्याशाखांसाठी हे बंधन पाळले जाईल.आपल्या महाविद्यालयातील जागा मर्यादीत असून त्यात प्रवेश आरक्षणाबाबत महाराष्ट्र शासन व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नियम तंतोतंत पाळले जातील.

**प्रवेश प्रक्रिया :** महाविद्यालयातील सर्व विद्या शाखांसाठीच्या सर्व अभ्यासक्रमांसाठी व एम.ए.समाजशास्त्रसाठी प्रवेश प्रक्रीया मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार महाराष्ट्र शासन व विद्यापीठ यांनी ठरविलेल्या नियमानूसार राहील.

प्रथम वर्ष कला, विज्ञान व वाणिज्य या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी :

१. १२ वी परिक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर साधारण २० दिवसांच्या आत प्रवेशाचे अर्ज मागणी करुन तेथून पाच दिवसात गुणवत्ता यादी जाहीर करण्यात येईल व तद्नंतर पाच दिवसात गुणवत्तेनुसार प्रवेश दिले जातील. ३० जुलै नंतर कोणासही प्रवेश दिला जाणार नाही.
   प्रवेश घेतल्यानंतर १५ दिवसाच्या आत प्रवेश रद्द केल्यास ५० टक्के फी परत मिळेल.
   त्यानंतर प्रवेश रद्द केल्यास फी परत मिळणार नाही.
२. प्रवेश अर्जा सोबत खालील कागदपत्र जोडणे आवश्यक आहे
   १) १० वी, १२ वी, मुळ गुणपत्रक व प्रत्येकी दोन छायांकीत प्रती
   २) शाळा सोडल्याचा दाखला मुळ प्रत व दोन छायांकीत प्रती
   ३) जातीचा,उत्पन्नाचा दाखला,एक छायांकीत प्रत
   ४) एक पास पोर्ट व दोन स्टॅम्प साईज फोटो
   ५) गॅप असल्यास गॅप सर्टीफिकेट

**टिप :** मुळ शाळा सोडल्याच्या दाखल्या शिवाय प्रवेश मिळणार नाही.
(डूप्लीकेट एल.सी./टि.सी.वर प्रवेश मिळणार नाही.)

**कला शाखा :**

- **प्रथम वर्ष कला (F.Y.B.A.)**

गट अ : सक्तीचे इंग्रजी
गट ब : मराठी/हिंदी/वैकल्पीक इंग्रजी (या पैकी कोणतेही एक भाषा)
गट क : समाजशास्त्र
गट ड : भूगोल
गट इ : अर्थशास्त्र/मानसशास्त्र
गट ई : इतिहास/संरक्षणशास्त्र
गट उ : राज्यशास्त्र/शिक्षणशास्त्र

सूचना : १) गट अ व ब सक्तीचा आहे.
२) उरलेल्या गटातून कोणतेही चार विषय निवडता येतील.

Principal
V.V.M.s' S. G Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.



Scanned with CamScanner

टिप : प्रथम वर्ष कला विज्ञान व वाणिज्य या वर्गासाठी पर्यावरण अभ्यास हा विषय अनिवार्य आहे. इंग्रजी, मराठी, हिंदी, अर्थशास्त्र, भूगोल, इतिहास, राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र हे विषय विशेषस्तरावर शिकविले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक गट निवडावा.

**द्वितीय वर्ष कला (S.Y.B.A.) : (एकूण सहा विषय)**

१) सक्तीचे विषय - अनिवार्य इंग्रजी
२) विशेष विषय : प्रथम वर्षात घेतलेल्या गटापैकी (एस १, एस २)
३) प्रथम वर्षात घेतलेल्या विषयापैकी तिन विषय (जी २)
४) प्रथम वर्षास मानसशास्त्र विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांना मानसशास्त्र (जी २) हा विषय सक्तीचा राहील.

टिप : विशेष विषयास विद्यार्थी संख्येची मर्यादा आहे.

**तृतिय वर्ष कला : (T.Y.B.A.) एकूण सहा पेपर्स**

१) सक्तीचे इंग्रजी - १ पेपर
२) द्वितीय वर्ष कला यावर्गात घेतलेल्या तीन विषयाचे (जी३) तीन पेपर्स
३) द्वितीय वर्ष कला या वर्गात निवडलेल्या विशेष विषयाचे दोन पेपर्स (एस-३ व एस्-४)

**वाणिज्य शाखा :**

**प्रथम वर्ष वाणिज्य (F.Y.B.Com.)**

1) English for Business
2) Marthi/ Hindi / Optional English (any one)
3) Micro economic Analysis
4) Financial & Cost Accounting
5) Computing skill & Quantitatfive techniques
6) Modern Office Management
7) Elective (any one) a) Marketing & Advertising b) Geography of Disasger Paper Change Manegement c) Priciples & Practice of Banking

**द्वितीय वर्ष वाणिज्य (S.Y.B.Com.)**

1) Macro Economic Analysis
2) Business & Tax Law
3) Business Management
4) Corporate Accounting & Costing
5) Computing Management & Business Communication
6) Business Entreprenuership
7) Retail Management

**तृतिय वर्ष वाणिज्य (T.Y.B.Com.)**

1) Indian Economic Scenario
2) Principles & Practices of Auditing
3) Income Tax & Soft Skill Development
4) Human Resource Management
5) Eletive (any one): a) Modern Management Techniques b) Investment Management
6) Advanced Accounting - I
7) Advanced Accounting - II

**विज्ञान शाखा :**

Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.





**थम वर्ष विज्ञान (F.Y.B.Sc.)**

थम वर्ष विज्ञान वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला खालीलपैकी कोणत्याही एका गटातील चार विषय घेता येतील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ट अ) | १) गणित | २) रसायनशास्त्र | ३) भौतिकशास्त्र | ४) वनस्पतीशास्त्र |
| ट ब) | १) भौतिकशास्त्र | २) रसानशास्त्र | ३) वनस्पतीशास्त्र | ४) प्राणीशास्त्र |

**द्वितीय वर्ष विज्ञान (S.Y.B.Sc.)**

एफ.वाय.बी.एस्सी वर्गात घेतलेल्या चार विषयांपैकी अ) गणित,भौतिकशास्त्र,रसायनशास्त्र ब) भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र क) रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र या गटातील एक गट आवश्यक राहील. याशिवाय इंग्रजी किंवा मराठी यापैकी एक विषय आवश्यक असेल.

**तृतीय वर्ष विज्ञान (T.Y.B.Sc.)**

एस . वाय. बी. एस्सी वर्गात घेतलेल्या तीन विषयापैकी कोणताही एक विषय विशेष म्हणून घेता येईल. महाविद्यालयात खालील विषय विशेषस्तरावर शिकविले जातात.

१) रसायनशास्त्र २) भौतिकशास्त्र ३) वनस्पतीशास्त्र ४) प्राणीशास्त्र

**विशेष सूचना :**

पर्यावरणशास्त्र हा अभ्यासक्रम प्रथम वर्ष कला/विज्ञान/वाणिज्य वर्गातील विद्यार्थ्यांसाठी सक्तीचा असेल. सामान्य ज्ञान हा विषय प्रथम व द्वितीय वर्षाच्या सर्व विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांसाठी सक्तीचा असेल. द्वितीय वर्षाच्या शेवटी या अभ्यासक्रमाची परिक्षा होईल. त्यासाठी विद्यापीठ नियमाप्रमाणे वेगळी फी आकारली जाईल.

**परीक्षा :**

Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.



Scanned with CamScanner

V.V.M.S. S.G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule



वडील हयात नसल्यास आईच्या उत्पन्नाचा दाखला व वडीलांचा मृत्यु दाखला तरी चालेल.
आई वडील हयात नसल्यास पालकांच्या उत्पन्नाचा दाखला व आई वडीलांच्या मृत्युचा दाखला.
मुलगी विवाहित असल्यास पतीच्या उत्पन्नाचा दाखला.
आई वडील विभक्त राहत असल्यास न्यायालयाच्या निकालाची प्रत विद्यार्थ्यांचे वडील सरकारी अथव निमसरकारी नोकरीत असतील तर त्यांचा एकूण वार्षिक उत्पन्नाचा दाखला (पगार,महागाई भत्ता,घरभाडे इत्यादी सहीत संबंधीत अधिकृत अधिकाऱ्यांच्या सही शिक्यानिशी जोडावा.

५. एनटी/एसबीसी/ओबीसी साठी नॉन क्रिमिलियर
६. शैक्षणिकवर्षात गॅप असल्यास तहसिलदार यांच्यासमोरील प्रतिज्ञापत्र
७. फ्रीशिपसाठी जात पडताळणी प्रमाणपत्र
८. महाविद्यालय बदल असल्यास मागील वर्षी मिळालेल्या शिष्यवृत्तीचा मान्यता क्रमांक व रक्कम.
९. वडीलांची बदली झाल्यामुळे विद्यार्थी बाहेरच्या जिल्ह्यातून आला असेल तर जिल्हा बदल प्रमाणपत्र
१०.आधार कार्ड झेरॉक्स प्रत व बँक पासबुक झेरॉक्स (अत्यावश्यक)

**नियम व अटी**

१. शिष्यवृत्तीसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांची हजेरी ७५% असली पाहीजे.
२. एका विद्यार्थ्यांस एकच अभ्यासक्रम पूर्ण करेपर्यंत शिष्यवृत्ती लागू राहील (उदा.११ वी, १२ वी कला बी.ए.,एम.ए.,एम.फिल,पीएच.डी.) परंतु एखाद्या विद्यार्थ्यांने बी.ए.नंतर बी.एड.हा अभ्यासक्रम पूर्ण केल आणि नंतर त्याने एम.ए.साठी प्रवेश घेतला तर एम.ए.कोर्ससाठी त्यास शिष्यवृत्ती मंजुर होणार नाही. परं बी.एड.नंतर एम.बी.ए.ला प्रवेश घेतल्यास तो प्रोफेशनल पदव्युत्तर अभ्यासक्रम असल्यामुळे त्यास शिष्यवृत्त मंजूर करता येईल. एका विद्यार्थ्यांस २ व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय असेल.
३. शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्याने ज्या अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती घेतलेली आहे. तो अभ्यासक्रम त्याने पू केला पाहिजे जर तो अभ्यासक्रम त्याने अर्धवट सोडला व दुसऱ्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला तर दुसऱ्य अभ्यासक्रमाची शिष्यवृत्ती त्यास मंजूर होणार नाही. विद्याशाखा बदल करणाऱ्या विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती मंजू होणार नाही.
४. व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करुन अव्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यास त्यास शिष्यवृत्ती मिळणा नाही. (उदा.बी.एड.अथवा एल.एल.बी.पूर्ण झाल्यानंतर पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती मिळणार नाही.
५. पुनःप्रवेशित विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही.
६. महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थी जर महाविद्यालयात शिकत असतील तर त्यांना महाराष्ट्र शासनातर्फे ही शिष्यवृत्ती मंजू होणार नाही.
७. शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन मुदतीत भरण्याची जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांची राहील.
८. शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्याला स्टेट बँक ऑफ इंडिया साक्री शाखा किंवा महाराष्ट्र बँक भाडणे शाखा या राष्ट्रीयकृ बँकेत खाते उघडणे आवश्यक आहे.
९. बँकेचा खाते क्रमांक (अकौंट नंबर) विद्यार्थ्याने अचुक द्यावा, चुकिचा खाते क्रमांक असल्यास शिष्यवृत्ती जमा झाल्यास सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.
१०. ईबीसी/एसटीसी/पिटीसी व शिष्यवृत्ती अर्ज न भरल्यास संपूर्ण फी भरावी लागेल.



V.V.M.S. S.G. Patil Arts, Sci. & Com. College, SAKRI, Dist.Dhule



**र स्कॉलरशिप व फी सवलतीबाबत :**

वर निर्देश केलेल्या स्कॉलरशीप, फ्री शीप व फी सवलती व्यतीरीक्त खालील प्रकारच्या फी सवलती व स्कॉलरशीप साठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळू शकतील.
स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलामुलींसाठी विशिष्ठ प्रकारचे अर्ज भरावयाचे असतात अशा अर्जाचा नमुना कार्यालयात मिळू शकेल.
अपंग विद्यार्थ्यांना महाशय सिव्हील सर्जन, यांच्या वैद्यकीय दाखल्याच्या आधारावर अपंग विद्यार्थ्यांची स्कॉलरशीप मिळू शकेल अशा विद्यार्थ्याने कार्यालयाशी संपर्क साधावा.
राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती, ओपन मेरीट स्कॉलरशिप, प्राथमिक शिक्षकांच्या मुलामुलींसाठी स्कॉलरशीप, इतर मागास वर्गीय विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशीप,गुणवत्ता शोध स्कॉलरशीप,विज्ञान शाखेतील हुशार विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशीप इ. साठी पात्र विद्यार्थ्यांनी कार्यालयात चौकशी करावी.

**ष सूचना :**

शासनामार्फत मिळणाऱ्या विविध शिष्यवृत्यांचा लाभ घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी चुकीची व खोटी माहिती पुरविल्यास त्यास वैयक्तिकरित्या जबाबदार समजले जाईल व त्याबाबत कायदेशिर कारवाई केली जाईल.
वरील सर्व बाबींच्या सूचना महाविद्यालयाच्या सूचना फलकावर वेळोवेळी लावल्या जातील. सदर सूचना पाहून मुदतीच्या आत अर्ज करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची असेल.मुदत बाह्य असलेल्या अर्जाचा विचार होणार नाही.
एकदा पात्रता झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विषय बदलण्यास परवानगी दिली जाणार नाही.
प्रथम वर्षात प्रवेशीत झालेल्या विद्यार्थ्यांनी आपले १२ वीचे मुळ गुणपत्रक १ ते १५ जानेवारी या कालावधीत कार्यालयातून घेऊन जावे.१ वर्षानंतर मुळगुणपत्रकाची जबाबदारी महाविद्यालयाची राहणार नाही याची नोंद घ्यावी.
शिक्षण बंद केल्यास किंवा पूर्णझाल्यानंतर एकावर्षाच्या आत विद्यार्थ्याने महाविद्यालयातून टीसी घेऊन जावे.

**त्र (Term) मंजुरीसाठी महत्वाच्या अटी :** केवळ महाविद्यालयात नाव दाखल केले व फी भरली म्हणजे सत्र मंजूर नाही. सत्र मंजूर होण्यासाठी पुढील गोष्टीचा विचार केला जातो.
विद्यार्थ्याची सर्व दिवस सर्व तासांना उपस्थिती आवश्यक आहे.
प्रत्येक विषयाचे स्वाध्याय (ट्युटोरियल) वेळच्यावेळी लिहून पूर्ण करणे.
त्याची फी वेळेवर देणे.
सर्व अंतर्गत परिक्षांना बसून समाधानकारक प्रगती दाखविणे.
महाविद्यालयात, वर्गात व वर्गाव्यतिरीक्त होणाऱ्या कार्यक्रमात भाग घेणे.
वर्गात व इतर कार्यक्रमांच्या वेळी त्याचे वर्तन सभ्य व शिस्तीचे असावे.
एन.सी.सी. परेडस्, राष्ट्रीय सेवा योजना शिबीर यांना नियमित हजर राहणे. वरील नियमाचे विरुध्द विद्यार्थ्याचे वर्तन यास त्यास योग्यती शिक्षा होईल.शिवाय त्याचे सत्र (Term) मंजूर केले जाणार नाही व परिक्षेस बसू दिले जाणार नाही.

**द्यार्थ्यांच्या वर्तनासंबंधी नियम :**

प्रत्येक विद्यार्थ्याने सर्व विषयाच्या तासांना वक्तशीरपणे उपस्थित राहणे आवश्यक आहे.
महाविद्यालयातर्फे घेतल्या जाणाऱ्या सर्व परिक्षांत प्रत्येक विषयात समाधानकारक प्रगती दाखविणे आवश्यक आहे.
महाविद्यालयातर्फे घेतल्या जाणाऱ्या सर्व परिक्षांत प्रत्येक विषयात समाधानकारक प्रगती दाखविणे आवश्यक आहे.
८०% पेक्षा कमी उपस्थिती असलेल्या व सहामाही आणि पूर्व परीक्षेस न बसणाऱ्या विद्यार्थ्याला वार्षिक परीक्षेस बसू दिले जाणार नाही. व त्यास फी संबंधी कोणत्याही सवलती दिल्या जाणार नाहीत.
प्रत्येक विद्यार्थ्यांने महाविद्यालयाने ठरवून दिलेल्या गणवेशात महाविद्यालयात येणे बंधनकारक आहे. (विद्यार्थ्यांसाठी ब्लॅक पॅन्ट-व्हाईट शर्ट, विद्यार्थीनींसाठी ब्लॅक सलवार किंवा पॅन्ट व व्हाईट टॉप कुर्ता)
महाविद्यालयात प्रवेश मिळाल्यावर प्रत्येक विद्यार्थ्यांस ओळखपत्र. दिले जाते, त्यावर आपला फोटो चिकटवून

